# महाराष्ट्र राज्य माहिती आयोग, खंडपीठ नागपूर

(प्रशासकीय इमारत क्र.२, पहिला माळा, सिव्हिल लाईन्स, नागपूर)

माहितीचा अधिकार

---

## माहितीचा अधिकार अधिनियम, २००५ मधील कलम १९ (३) अन्वये प्राप्त झालेले व्दितीय अपील

**अपील क्रमांक : १३८६/२०२२**

| अपिलार्थी | प्रतिवादी | |
|---|---|---|
| | जन माहिती अधिकारी | प्रथम अपिलीय अधिकारी |
| श्री. पराग तिलकरामजी विरखरे, झिंगाबाई टाकळी, झेंडा चौक, जुनी वस्ती मानकापूर, नागपूर-४४००३० | अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर | सहाय्यक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर |

**सुनावणी दिनांक :- १४.११.२०२४**

१. उपस्थिती –

| अपिलार्थी | विद्यमान जन माहिती अधिकारी | तत्कालीन जन माहिती अधिकारी | विद्यमान प्रथम अपिलीय अधिकारी | तत्कालीन प्रथम अपिलीय अधिकारी |
|---|---|---|---|---|
| अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित | उपस्थित | अनुपस्थित |

२. व्दितीय अपील अर्ज –

(१) **व्दितीय अपील अर्जाचा दिनांक** : २३.०५.२०२२

(२) **व्दितीय अपील अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक** : २४.०५.२०२२.

(३) **व्दितीय अपील अर्जात नमूद केलेली कारणे** : माहिती अपुर्ण मिळालेली आहे.

(४) **व्दितीय अपील अर्जान्वये केलेली विनंती** : कोणतीही विनंती केलेली नाही.

**माहिती अर्ज –**

(१) माहिती अर्जाचा दिनांक : २१.०२.२०२२

(२) माहिती अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २४.०२.२०२२

(३) कोणत्या कालावधीची संबंधित माहिती हवी आहे तो कालावधी : दि. १०.०२.२०२२ व दि. ३१.०१.२०२२

(४) जन माहिती अधिकारी यांचेकडे मागणी केलेली माहिती : दि. १०.०२.२०२२ रोजी पराग विरखरे, महाराष्ट्र नवनिर्माण सेना, सचिव पश्चिम नागपूर यांनी अधिक्षक अभियंता यांना दिलेली तक्रार पत्र व दि. ३१.०१.२०२२ रोजी पोलीस स्टेशन मानकापूर येथील जा.क्र. ३७ सदरचा चौकशी अर्ज या दोन्ही तक्रार अर्जावरती आपल्या विभागातर्फे काय चौकशी व कार्यवाही केलेली आहे. याची विस्तृत स्वरुपात माहिती देण्यात यावी व चौकशी किंवा कार्यवाही केली नसल्यास तसे देखील द्यावे, अशी माहिती मागितली आहे.



राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर

(५) जन माहिती अधिकारी यांनी माहिती अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी अपिलार्थी यांना दि. ११.०१.२०२१ रोजीच्या पत्रान्वये पोलीस स्टेशन मानकापूर ला सादर केलेल्या तक्रारीची प्रत सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर कार्यालयास दि. १३.०१.२०२२ रोजी प्राप्त झाली आहे. सदर तक्रारीच्या अनुषंगाने केलेल्या कार्यवाही प्रत एकूण १ पृष्ठ अपिलार्थीस दि. ११.०३.२०२२ रोजीच्या पत्रान्वये निशुल्क् पुरविण्यात आली.

३. **प्रथम अपील –**

(१) प्रथम अपील अर्जाचा दिनांक : १६.०३.२०२२

(२) प्रथम अर्ज प्राप्त झाल्याचा दिनांक : २१.०३.२०२२

(३) प्रथम अपील दाखल करण्याचे कारण : चूकीची माहिती मिळाली आहे.

(४) अपिलीय अधिकारी यांनी प्रथम अपील अर्जाच्या अनुषंगाने केलेली कार्यवाही : प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहायक अभियंता श्रेणी-१, सार्वजनिक बांधकाम मंडळ, नागपूर यांनी दि. २८.०१.२०२१ रोजी सुनावणी घेतली. प्रस्तुत प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रावरुन प्रथम अपिलीय अधिकारी या निष्कर्षाला येत आहे की, शासकीय माहिती अधिकारी यांनी मा.अ.अ. मधील तरतुदीनुसार केलेली कार्यवाही योग्य आहे व अपिलार्थी यांचे सामाधान झाले आहे. वरील प्रमाणे वस्तुस्थिती पाहता, प्रथम अपिल निकाली काढण्यात येत आहे, असा आदेश दि. २२.०४.२०२२ रोजी निर्गमित केला.

४. **युक्तीवाद/लेखी खुलासा –** आज सुनावणीस अपिलार्थी अनुपस्थित असून जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सा.बां. मंडळ, नागपूर, श्री. सुनिल ज्ञानवाडकर उपस्थित असून प्रथम अपिलीय अधिकारी तथा सहा. अधिक्षक अभियंता, सा.बां. मंडळ, नागपूर, श्री. सुनिल कुबडे उपस्थित आहेत. विद्यमान जनमाहिती अधिकारी यांनी अपिलार्थीने मागितलेल्या माहिती सदंर्भात त्यांना दिलेल्या प्रतिसादाचे दस्ताऐवज आयोगास सादर केले आहे. तसेच अपिलार्थी व्दितीय अपिल सुनावणीस अनुपस्थित असल्याने त्यांच्याबाजूने कोणतेही स्पष्टीकरण प्राप्त झाले नाही.

५. **निष्कर्ष –** सदर प्रकरणातील उपलब्ध कागदपत्रांवरून आयोग खालील निष्कर्षाप्रत येत आहे.

१) अपिलार्थी यांच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या तक्रारीनुसार जनमाहिती अधिकारी यांनी उत्तर देत असतांना जेवढी कार्यवाही संबधीत पत्रानुषंगाने झाली होती त्याबाबतची वस्तुस्थिती त्यांना कळविणे आवश्यक आहे.

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग

सबब , खालीलप्रमाणे आदेश पारीत करण्यात येत आहे.

**आदेश**

१) जनमाहिती अधिकारी तथा अधिक्षक, सा.बां. मंडळ, नागपूर यांनी अपिलार्थी यांच्या दि. २१.०२.२०२२ रोजीच्या माहिती अर्जात नमूद केलेल्या तक्रारीनुसार उत्तर देत असतांना जेवढी कार्यवाही संबधीत पत्रानुषंगाने झाली आहे त्याबाबतची वस्तुस्थिती त्यांना सदर आदेश प्राप्त होताच २ आठवड्याच्यात कळविण्यात यावे व त्याबाबतचा अहवाल आयोगास सादर करावा.

२) या आदेशासह प्रस्तुत अपिल निकाली काढण्यात येत आहे.

(भुपेंद्र गुरव)
राज्य माहिती आयुक्त
खंडपीठ नागपूर

राज्य माहिती आयोग खंडपीठ नागपूर विभाग नागपूर

**ठिकाण : नागपूर**
**दिनांक : १४.११.२०२४**

जावक क्रमांक 212 दिनांक 13 JAN 2025

SD-2024/1386-2022/विरखरे